विषय : ई-निविदा नस्तींबाबत.

*नाशिक जिल्हा परिषद, नाशिक*
मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे वैयक्तिक कार्यालय
परिपत्रक क्रमांक : मुकाअ/वैका/647/2017
नाशिक, दिनांक :22/12/2017.

वाचा : महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र.संकिर्ण-2010/ प्र.क्र.172/पंरा-7, दिनांक 19 ऑक्टोबर, 2011.

## -: परिपत्रक :-

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय संकिर्ण-2010/प्र.क्र.172/पंरा-7, दिनांक 19 ऑक्टोबर, 2011 अन्वये ई-निविदा प्रणाली लागु करण्यांत आली आहे.

त्या अनुषंगाने आपल्या विभागातंर्गत प्राप्त निविदा उघडण्यांत आल्यानंतर तांत्रीक लिफाफे उघडण्यांत येऊन, तांत्रीक छाननी केली जाते. तांत्रीक छाननी झालेनंतर त्यामध्ये अपूर्तता असल्यास, अपूर्तता असलेल्या निविदाधारकांस तांत्रिक दृष्टया आपल्या विभागस्तरावरच अपात्र केले जाते, परंतू सदर निविदाधारकांस कोणत्या कारणास्तव अपात्र करण्यांत आले याची कारणमिमांसा नमुद केली जात नाही. परिणामी ई-निविदा प्रकरणांचे संदर्भात माझेकडेस मोठया प्रमाणांत तक्रारी प्राप्त होतात.

यास्तव याव्दारे आपणांस सूचीत करण्यांत येते की, यापुढे तांत्रीक दृष्टया अपूर्तता असलेल्या निविदाधारकांस आपल्या विभागस्तरावर अपात्र न करता सदरची नस्ती माझे मान्यतेस्तव सादर करावी. नस्ती सादर करतांना संबंधित निविदाधारकांस कोणत्या कारणास्तव अपात्र करण्यांत आले आहे हे नस्तीतील टिप्पणीमध्ये स्पष्टपणे नमुद करावे, जेणे करुन निर्णय घेणे सोईस्कर होईल.

CHIEF EXECUTIVE OFFICER ZILLA PARISHAD, NASHIK सत्यमेव जयते

22/12

(दीपक कुमार मीना)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, नाशिक.

प्रति,

०१) प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नाशिक.
०२) महिला व बालविकास अधिकारी, जि.प.नाशिक.
०३) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पा.व स्व.), जि.प.नाशिक.
०४) शिक्षणाधिकारी (प्राथमिक),(माध्यमिक),(निरंतर), जिल्हा परिषद, नाशिक.
०५) कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, जि.प.नाशिक.
०६) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक.
०७) उप अभियंता (यांत्रिकी), भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, जि.प.नाशिक.

प्रत : कार्यालयीन प्रत/ज्ञापन नस्ती.
प्रत : साप्रवि/आय.टी.सेल.
२/- सदरचे परिपत्रक जिल्हा परिषदेच्या वेबसाईटवर प्रसिध्दसाठी

Scanned by CamScanner